ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख १८ जानेवारी, १९५६ अंक ३

## विविध माहिती

**रशिआचें तेलाचें उत्पादन**—सोव्हिएट सरकारच्या तेलखात्याच्या मंत्र्यांनीं रशिआंतील तेलाचें उत्पादन झपाट्यानें वाढत असल्याचें जाहीर केलें आहे. १९५० सालाच्या तुलनेनें तेलाच्या उत्पादनांत ८५ टक्के वाढ करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. युद्धापूर्वी रशिआच्या तेलाच्या उत्पादनापैकीं फक्त ६ टक्के तेल पूर्व रशिआंत पैदा होत असे. आतां त्या भागांत ५८ टक्के निर्मिती होऊं लागली आहे.

**दारूबंदीला अनुकूल राज्यें**—दारूबंदी-विषयीं चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिशनच्या योजनेप्रमाणें, चार राज्य-सरकारांनीं आपण दारूबंदी अंमलांत आणण्यास तयार आहों असें मध्यवर्ती सरकारला कळविलें आहे. मात्र, मध्यवर्ती सरकारनें दारूबंदीमुळें उत्पन्नांत होणारी घट मदत देऊन भरून काढावी अशी त्यांची मागणी आहे. पंजाब, उत्तर-प्रदेश, हिमाचल प्रदेश व त्रावणकोर-कोचीन हीं तीं राज्यें होत.

**रेडिओ केंद्रांचा विस्तार**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मुंबई, मद्रास व तिरुचिरापल्ली ह्या ठिकाणच्या रेडिओकेंद्रांचा विस्तार करण्यांत येणार आहे. पांच वर्षांत मिळून विस्ताराच्या नव्या योजनांवर २१४·८ लाख रुपये खर्च करण्यांत येतील. त्यांपैकीं २५·२१ लाख रुपये १९५६-५७ सालांत खर्च होतील. इतर रेडिओ-केंद्रांपेक्षा मुंबई केंद्रावर सर्वांत अधिक खर्च करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील मोटारींचा धंदा**—१९५६ सालीं अमेरिकेंतील मोटारींच्या धंद्याला मंदी येईल अशीं भाकितें त्या धंद्यांतील पुढारलेले कारखानदार करीत आहेत. १९५५ च्या मानानें १९५६ सालीं मोटारींच्या उत्पादनांत १२ टक्के घट होईल असें मत जनरल मोटार्सच्या अध्यक्षांनीं व्यक्त केलें आहे. इतरांच्या मतानें ही घट १५ टक्केहि होण्याचा संभव आहे, १९५५ सालीं सुमारें ८०,००,००० मोटारी तयार करण्यांत आल्या होत्या.

**वैद्यकीय कॉलेजला मदत**—त्रिवेंद्रम् मेडिकल कॉलेजला जोडलेल्या इस्पितळाला रॉकफेलर फौंडेशन ह्या अमेरिकन संस्थेकडून ३५,००० डॉलर्सची देणगी मिळाली आहे. कॉलेज-मधील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या रीतीनें शिक्षण देतां यावें म्हणून ही देणगी देण्यांत आली आहे.

**अमेरिकेकडून पोलादाचा पुरवठा**—भारतीय रेल्वे-रस्त्यांच्या दुरुस्तीसाठीं १० लाख टन पोलाद आणण्याचा करार भारतीय सरकारनें अमेरिकेशी केला आहे. भारताच्या हिवताप विरोधी मोहिमेंत वापरण्यासाठीं ६,००० टन डी. डी. टी. घेण्याचाहि करार करण्यांत आला आहे.

**शिक्षणासाठीं फंड**—गोध्रा येथील प्रमुख नागरिकांची व सार्वजनिक कार्यकर्त्यांची एक बैठक भरली होती. गांवांतील माध्यमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठीं १९५६ अखेर ३ लाख रुपयांचा फंड जमविण्यांत यावा असा ठराव त्यांनीं केला आहे. गोध्रा येथील जनतेनें पैसे जमविण्यास सुरवात केली असून एका दिवसांत ६५,००० रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत.

**भारत ऑस्ट्रिआ व्यापारी करार**—१९५५ अखेर संपणाऱ्या उभयतामधील व्यापारी कराराचा मुदत भारताच्या व ऑस्ट्रिआच्या सरकारांनीं १९५६ च्या जूनअखेरपर्यंत वाढविली आहे. दोन्ही देशांतील व्यापार समाधानकारक रीतीनें वाढू लागला आहे. भारत ऑस्ट्रिआपासून पोलाद, यंत्रसामुग्री, कागद व वाहनें आयात करतो. व उलटपक्षीं कापूस, लोकर, चहा, तेलें व खनिजें ह्यांचा पुरवठा करतो.

**अल्पबचतीच्या मोहिमेचें यश**—सुरत जिल्ह्यांत १९५५-५६ सालीं अल्पबचतीचा प्रचार करून १२० लाख रुपये जमविण्याचें ठरविण्यांत आलें होतें. डिसेंबर १९५५ अखेर पुऱ्या झालेल्या ९ महिन्यांत ह्या योजनेप्रमाणें ८० लाख रुपये जमविण्यांत आले आहेत. मार्च १९५६ अखेर संपणाऱ्या तीन महिन्यांत उरलेले ४० लाख रुपये जमवून उद्दिष्ट पूर्ण करण्याची विनंति जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं लोकांना केली आहे.

**कर्जाच्या अटींना विरोध**—इजिप्तमध्यें नाइल नदीवर आस्वीन ह्या ठिकाणीं जलविद्युत् निर्माण करण्यासाठीं मोठें धरण बांधण्याचा इजिप्तच्या सरकारचा विचार आहे. ह्या कामासाठीं जागतिक बँकेनें २० कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. परंतु कर्जाबद्दल घालण्यांत आलेल्या कांहीं अटी इजिप्तच्या सरकारला नामंजूर आहेत, असें समजतें.

**समाजविकास योजना पाहण्याची इच्छा**—सौदी अरेबिआ, इराक, इराण व इजिप्त ह्या देशांच्या सरकारांकडून भारतामधील समाजविकास योजनांचा अभ्यास करण्याची इच्छा प्रदर्शित करण्यांत आली आहे. विकास-योजनांच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठीं त्या देशांतील प्रतिनिधी-मंडळें भारतांत येण्यास उत्सुक आहेत.

**ग्रंथालयासाठीं नवी इमारत**—पाली भाषेच्या व बुद्ध-विषयक संशोधनाच्या पदवीनंतरच्या अभ्यासासाठीं नालंदा येथें एक ग्रंथालय स्थापन करण्यांत आलें आहे. ग्रंथालयासाठीं सुमारें ३,१२,००० रुपये खर्चून नवीन इमारत बांधण्यांत येणार आहे. खर्चापैकीं १,८०,००० रु. इतकी रक्कम भारतीय सरकारनें देणगी म्हणून मंजूर केली आहे.

## कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेचा सुवर्ण महोत्सव

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड हिचा सुवर्ण महोत्सव बुधवार ता. १८ जानेवारीस बँकेच्या कार्यालयांत व रविवार ता. २२ जानेवारीस नूतन मराठी विद्यालयाच्या इंग्रजी शाळेच्या आवारांत प्रो. द. गो. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा होणार आहे. को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या नांवानें १८ जानेवारी १९०६ रोजीं कॉसमॉसची स्थापना झाली व २२ मे १९२८ ला तिचें बँकेंत रूपांतर झालें. सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या मुंबई राज्यांतील पहिल्या पांच नागरी बँकांपैकी कॉसमॉस ही एक आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. ग. न. जेजुरीकर कॉसमॉसच्या प्रगतीची माहिती सांगतांना म्हणाले कीं, पुण्यांतील सर्व नागरिकांना सभासदत्व खुलें ठेवणारी पुणें जिल्ह्यांतील आमचीच पहिली संस्था होय. संस्थेची स्थापना झाली तेव्हां तिचे ९९ सभासद, ९८५१ रुपये खेळतें भांडवल, एकूण ठेवी २५७६ रु. व गंगाजळी ४० रुपये अशी परिस्थिति होती. ३० जून १९५५ अखेर वसूल भांडवल १,१२,४८०, गंगाजळी ८१,३३५ रु. आणि इतर निधी रु. ८१,४५० व ठेवी १२,२८,३७० रुपये अशी आजची प्रगति आहे.

संस्थेच्या स्थापनेच्या सुरुवातीस बहुसंख्य सभासद सरकारी नोकर होते. आज त्यांत नोकरी व व्यापार करणारे, सेवानिवृत्त व सुखवस्तु, शिक्षक व प्राध्यापक, डॉक्टर, वकील, कॉन्ट्रॅक्टर्स व इंजिनियर्स असे विविध क्षेत्रांतील म्हणजे पुण्यांतील मध्यमवर्गीय जनतेची बँक असें स्वरूप कॉसमॉसला आलें आहे असें श्री. जेजुरीकर म्हणाले. बँक १९४४ सालीं सध्यांच्या नव्या इमारतींत आली. ही जागा आतां अपुरी असल्यामुळें नवी इमारत बांधण्याचा विचार चालू आहे.

अखिल भारतांत १९५४ मध्यें सहकारी सुवर्ण महोत्सव साजरा करण्यांत आला. त्या निमित्तानें पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें पुणें जिल्ह्यांतील नागरी सहकारी बँकांच्यासाठी एक चांदीची फिरती ढाल बक्षिसादाखल ठेवली होती. नागरी सहकारी क्षेत्रांत कॉसमॉसनें बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल ही ढाल पहिल्याच वर्षी कॉसमॉसला देण्यांत आली, याचा श्री. जेजुरीकर यांनीं मुलाखतींत उल्लेख केला. १९२० सालीं या बँकेनें प्रथमच अ वर्ग मिळविला तेव्हांपासून एकहि वर्ष खंड पडूं न देतां सुवर्ण महोत्सवापर्यंत म्हणजे सतत ३५ वर्षे तिनें तो वर्ग टिकवला आहे असेंहि त्यांनीं सांगितलें.

### महाराष्ट्र बँकेच्या ठेवींत १ कोटीनें वाढ

महाराष्ट्र बँकेजवळील ठेवींत गेल्या वर्षी १ कोटि रुपयांची भर पडली. ३,४६,१०३ रु. नफा झाला. पूर्वीच्या ११ वर्षांप्रमाणें ५% डिव्हिडंड दिलें जाईल.

### दि बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९५५ मध्यें ९४·०२ लक्ष रु. नफा झाला. गेल्या वर्षी तो ८४·३१ लक्ष रु. होता. भागदारांना १६% करमाफ डिव्हिडंड मिळेल; गेल्या वर्षी १४% मिळालें होतें.

### साखर कारखान्यांजवळील साठा

भारतांतील साखर कारखान्यांच्या नव्या मोसमास (नोव्हेंबर, १९५५ ते ऑक्टोबर, १९५६) ४,४९,८३२ टन साखरेच्या शिलकेनें प्रारंभ झाला. गेल्या मोसमाचे प्रारंभीं फक्त ६७,६६३ टन साखर शिल्लक होती.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुं..तील एक प्रसिद्ध निवासस्थान

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
[ शेड्यूल्ड बँक ]
हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद
ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले
बैलांनी व पॉवरवर चालणारे
आपल्या पसंतीनुरूप आणि गरजेप्रमाणें योग्य चरकाची निवड करा.
सविस्तर माहिती आजच मागवा.
किर्लोस्करवाडी द. सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. १८ जानेवारी, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सार्वजनिक मालकीच्या अर्थ-विभागाचा विस्तार

### लोकांनीं त्याग कोणासाठीं करावयाचा ?

भारताच्या नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या स्टँडिंग कमिटीची बैठक दिल्ली येथें भरली होती. ह्या बैठकींत, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला अनुलक्षून कांहीं दूरगामी सूचना प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांनीं विचारार्थ मांडल्या होत्या. अर्थ-विभागापैकी सार्वजनिक मालकीच्या भागाचा विस्तार, उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण आणि अर्थव्यवस्थेचें नियमन ह्या कल्पना त्यांनीं केलेल्या सूचनांच्या मुळाशीं दिसून येतात. भारताला समाजवादी पद्धतीच्या समाजरचनेकडे वाटचाल करावयाची असेल तर सार्वजनिक मालकीच्या अर्थविभागाचा विस्तार सतत करीत राहिलें पाहिजे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. भारत हा देश अविकसित आहे आणि त्यानें द्रुतगतीनें नियोजित आर्थिक विकास करण्याचें धोरण स्वीकारलेलें आहे. अशा परिस्थितींत सार्वजनिक मालकीच्या अर्थविभागाचा विस्तार करणें ही बाब समाजवादाच्या प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यक आहे. ह्या विभागाचा विस्तार न केल्यास मोठ्या प्रमाणावर करण्यांत येणाऱ्या नियोजित विकासामुळें प्रत्यक्षतः सामाजिक विषमता अधिकच वाढेल आणि पूर्वीपेक्षाहि अधिक असें आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण घडून येईल. भारत स्वतंत्र झाल्यापासून आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण अधिकच झालें आहे असें मानण्यास पुरेशीं कारणें आहेत असा इशाराहि त्यांनीं दिला आहे.

खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्राचे त्यांनीं दोन भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागांत लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांचा समावेश करण्यांत आलेला असून ह्या गटालाच खऱ्या अर्थानें खाजगी पुढाकारानें उभारण्यांत आलेले धंदे म्हणतां येईल, असें सूचित करण्यांत आलें आहे. दुसऱ्या भागांत मक्तेदारी स्वरूपाच्या बड्या भांडवलदारांच्या मालकीच्या उद्योगधंद्यांचा समावेश करण्यांत आलेला आहे. दुसऱ्या गटाचीं विशिष्ट अशीं लक्षणें आहेत. ह्या गटांतील प्रत्येक प्रकारच्या उद्योगधंद्याच्या कारखान्यांची संख्या मर्यादित असते, आणि ते सर्व कारखाने एकत्र येऊन आपल्या मालाच्या बाजारपेठेचें बऱ्याच प्रमाणांत नियंत्रण करूं शकतात. यंत्रशक्तीच्या साह्यानें चालणारे बहुतेक सर्व मोठे कारखाने ह्या गटांत येतात. त्याशिवाय बँकिंग व इन्शुअरन्सचे व्यवसाय, बहुतेक सर्व प्रकारचा परदेशी व्यापार आणि देशांतर्गत व्यापारापैकी घाऊक व्यापार, हेहि मक्तेदारी आर्थिक संघटनेच्या कक्षेंत येतात. खाजगी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रापैकी हाच भाग असा आहे कीं ज्यांत वरकड मूल्य निर्माण केलें जातें. त्याचप्रमाणें, विकासासाठी करण्यांत यावयाच्या भांडवल-गुंतवणुकीमुळें ह्याच भागाचा अधिक फायदा होतो. नियोजन करावयाचें म्हटलें म्हणजे आर्थिक व्यवहारांवर सरकारचें नियमन ओघानेंच आलें. नियमनाचा परिणाम म्हणून ह्याच भागांत अधिक केंद्रीकरण होतें. सध्यांच देशाच्या आर्थिक जीवनांत ह्या भागाचें सर्वांत अधिक वजन आहे. त्यामुळें आर्थिक सत्तेचा वापर करण्याचें त्याचें सामर्थ्यहि वाढत जातें. ह्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्राप्तीवरील कर अगर वारसा-कर ह्याच्यांत केवळ वाढ करण्यानें भागणार नाहीं.

अशा प्रकारचें केंद्रीकरण वाढत गेलें तर त्याचे राजकीय व आर्थिक परिणाम असे होतील कीं, त्यांच्यामुळें समाजांतील इतर लोकांना विकासासाठी त्याग करावयास सांगणें अवघड होऊन बसेल; शिवाय असा प्रयत्न करणें न्यायाला धरूनहि होणार नाहीं. समाजवादी पद्धतीच्या समाजरचनेचें ध्येय तात्पुरतें दृष्टीआड केलें तरी सुद्धां मक्तेदारी भांडवलदारांनीं खाजगी उद्योगधंद्यांचें जें क्षेत्र व्यापिलें आहे त्याच क्षेत्रांत सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांचा विस्तार करणें आतां तातडीचें झालें आहे; आणि समाजवादी ध्येयाच्या दृष्टीनें तर तसें करणें अनिर्वाह्यच आहे. मक्तेदारी भांडवलदारांनीं व्यापलेला सर्वच्या सर्व औद्योगिक विभाग सार्वजनिक मालकीचा करणें हाच ह्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा खरा मार्ग आहेत. ह्या बाबतींत कांहीं उपाय ताबडतोब करता येण्यासारखे आहेत. खाणींतील उत्पादन, विजेचें उत्पादन व वांटप, भांडवली माल उत्पन्न करणारे कारखाने, सिमेंट, भारी रसायनें, ह्यांच्यासारखा मूलभूत स्वरूपाचा माल निर्माण करणारे कारखाने, ह्या उत्पादन-शाखांत आतां नवे खाजगी मालकीचे उद्योगधंदे काढूं देऊं नयेत. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, आधुनिक स्वरूपाचे सर्व नवे कारखाने आतां सार्वजनिक मालकीचे काढण्यांत यावेत. त्याचप्रमाणें, सर्व महत्त्वाच्या मालाची आयात-निर्यात मार्केटिंग बोर्डस स्थापन करून त्यांच्या द्वारें करण्यांत यावी. विम्याच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें आणि सर्व देश व्यापणारी अशी बँकिंगची एकसंध पद्धत सुरू करण्यांत यावी. त्याशिवाय, शेतीचा माल आणि छोट्या उद्योगधंद्याचा माल ह्यांची विक्री करण्यासाठी सहकारी पतपेढ्या काढणें, गुदामें बांधणें, ह्या उपायांचाहि अवलंब करण्यांत यावा. देशाची अर्थव्यवस्था जसजशी विकास पावत जाईल त्या त्या प्रमाणांत आर्थिक व्यवहार सांभाळण्याची सरकारची कुवतहि वाढत गेली पाहिजे; नाहीं तर ते व्यवहार खाजगी मालकीच्या क्षेत्रांत वर्ग करणें अपरिहार्य ठरेल. पण सरकारची ह्या बाबतींतील कुवत वाढविण्याकडे फारच थोडें लक्ष दिलें जात आहे, अशी तक्रारहि त्यांनीं केली आहे.

### आजच्या अंकास उशीर कां ?

मंगळवार, दि. १७ रोजीं सार्वत्रिक हरताळामुळें "अर्था"ची छपाई होऊं शकली नाहीं व अंक टपालांत टाकतां आला नाहीं. त्या कारणानें, हा अंक एक दिवस उशीरां प्रसिद्ध होत आहे.

**भारतामधील साबणाचे कारखाने**—कोइमतूर येथील साबणाच्या कारखानदारांनीं श्री. नवल टाटा ह्यांचें स्वागत केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. टाटा म्हणाले कीं, साबणाच्या धंद्या-संबंधीं चवकशी करण्याचें भारतीय सरकारनें अद्याप मनावर न घेतल्याबद्दल मला खेद होतो. भारतामध्यें साबणाचे ७३ कारखाने आहेत. पण त्यांना परकीय साबणाला तोंड द्यावें लागत आहे. देशांतील कारखान्यांची जास्तींत जास्त उत्पादनक्षमता कारणीं लावल्याखेरीज परदेशीय कारखानदारांना येथें विस्तार करूं देण्यांत येऊं नये.

**पाटबंधाऱ्यांचा प्रभाव**—उत्तर-प्रदेश सरकारचे मंत्री श्री. त्रिपाठी ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना असें जाहीर केलें कीं, राज्यांत आतां जरूरीपेक्षा १४ लक्ष टन अधिक धान्याची पैदास दरसाल होऊं लागली आहे. पण फक्त दोनच वर्षांपूर्वी उत्तर-प्रदेशांत ९ लाख टन धान्याची टंचाई भासत होती. राज्य सरकारनें पूर्ण केलेल्या पाटबंधाऱ्यांच्या कामाचें हें फळ आहे, असेंहि ते म्हणाले.

**विकास-योजनेचा प्रसार**—चंबळ नदीखोरें योजनेविषयीं हिंदींत उत्कृष्ट नाटक लिहिणाऱ्या ग्रंथकाराला १,००० रुपयांचें पारितोषिक देण्यांत येईल, असें राजस्थानच्या सरकारनें जाहीर केलें आहे. ह्या स्पर्धेत राजस्थान, अजमीर व अबू ह्यामधील लेखकांनाच भाग घेतां येईल. नाटक स्वतंत्र असावें आणि त्याला राजकारणाचा अगर जातीवादाचा वासहि येऊं नये, अशी सरकारची अपेक्षा आहे.

**नवी सहकारी बँक**—छोट्या उद्योगधंद्यांना व ग्रामोद्योगांना मदत करण्यासाठी अहमदाबाद येथें एक नवीन औद्योगिक सहकारी बँक स्थापन करण्यांत येणार आहे. सहकारी क्षेत्रांत काम करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक ह्या कामासाठी भरली असतां, तींत बँकेसाठी ६०,००० रुपयांचें भाग भांडवल जमा करण्याचें ठरविण्यांत आलें. उत्तर गुजरातमधील ५ जिल्ह्यांतून हें भांडवल जमा करण्यांत येणार आहे.

**मध्यवर्ती सरकारची मदत**—राष्ट्रीय पाणीपुरवठा व सांडपाणी ह्यासंबंधीच्या योजना पूर्ण करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें मध्यप्रदेश सरकारला १६,२२,००० रुपयांचें कर्ज दिलें आहे. ह्या कामासाठी ५६,००,००० रुपयांचें एकूण कर्ज देण्यांत येणार आहे. मध्यप्रदेश सरकारनें कर्जादाखल मिळालेली रक्कम राज्यांतील स्थानिक-स्वराज्य संस्थांत वांटून दिली आहे.

**पंजाबमधील पुरामुळें झालेली हानि**—गेल्या वर्षी आक्टोबरमध्यें पंजाबमध्यें झालेल्या अतिवृष्टीमुळें सुमारें ५,००० एकर जमीन वालुकामय झाली असून पीकपाण्यास अयोग्य बनली आहे. उलटपक्षीं, कांहीं भागांत ६ इंच गाळाचा थरच जमिनीवर बसल्यानें तेथील जमिनीचा सुपीकपणा खूपच वाढला आहे. वालुकामय झालेल्या प्रदेशांतहि मधून मधून चांगल्या जमिनींचे पट्टे राहिले आहेत.

**ब्रिटिश कारखान्याला कंत्राट**—उत्तर प्रदेशांत मिर्झापूरजवळ वाफेच्या साहाय्यानें वीज निर्माण करण्याचें केंद्र उभारण्यांत येणार आहे. केंद्रासाठी लागणारी यंत्रसामुग्री पुरविण्याचें कंत्राट 'दि ब्रश एक्सपोर्ट लि.' ह्या ब्रिटिश कारखान्याला मिळालें आहे असें समजतें. यंत्रसामुग्रीची किंमत सुमारें ३,६०,००० पौंड होईल. ह्याच कंपनीनें उत्तर-प्रदेशांत चालू करण्यांत आलेल्या एका सिमेंटच्या कारखान्याची यंत्रसामुग्रीहि पुरविली आहे.


# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) | श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पद्मजी |
| श्री. मा. वी. शहा | श्री. भा. म. गुप्ते |
| रा. ब. म. बा. जांभेकर | श्री. म. स. पारखे |

: शाखा :

अहमदनगर, अमरावती, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर (म्हैसूर सं.), हुबळी, व. हैद्राबाद, जळगांव, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर, व ठाणें.

मुख्य कचेरी:-　　　चिं. वि. जोग,

थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.　　　मॅनेजर.

## अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी कॉलेज

जागतिक बँकेनें 'इकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन्स्टिटयूट' ह्या नांवाची एक संस्था स्थापन केली आहे. संस्थेचें स्वरूप 'स्टाफ कॉलेज' सारखें आहे. जागतिक अर्थशास्त्रीय प्रश्नांचा अभ्यास करण्याची सोय संस्थेमध्यें करण्यांत आलेली असून तींत अविकसित देशांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना अधिक अध्ययन करतां येईल. ग्लासगो विद्यापीठांतील प्रोफेसर अलेक्झांडर केरनक्रॉस हे संस्थेचे चालक म्हणून काम पहाणार आहेत. संस्थेच्या कार्यपद्धतीचा हेतु सांगतांना त्यांनीं काढलेले उद्गार फार सूचक आहेत. ह्याविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं "आर्थिक विकास साधण्याच्या अत्याचारी व हुकूमशाही पद्धती आहेतच. पण त्या टाळून त्यांच्याऐवजीं दुसऱ्या पर्याय पद्धती शोधून काढण्याचें काम आपल्याला करावयाचें आहे. त्याचबरोबर आणखीहि एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष देणें जरूर आहे. आज जगांत कांहीं देश इतर देशांच्या मानानें अप्रगत असे आहेत. त्या देशांतील लोकांचा आर्थिक उत्कर्ष घडवून आणण्यासाठीं त्यांच्या कर्तृत्वाला आवाहन दिलें गेलें पाहिजे आणि उत्कर्षासाठीं कराव्या लागणाऱ्या कामाचें ध्येय त्यांच्या मनावर बिंबविलें गेलें पाहिजे. त्याचप्रमाणें ह्या कामांत आपणहि सहभागी आहोंत अशी जाणीव त्यांच्यांत उत्पन्न केली गेली पाहिजे." अभ्यासक्रम ६ महिन्यांचा आहे. पहिल्या अभ्यासक्रमासाठीं १४ अधिकारी कॉलेजमध्यें दाखल झाले आहेत. पुढील अभ्यासक्रमासाठीं ह्यापेक्षा अधिकाधिक विद्यार्थी येतील अशी अपेक्षा आहे. कॉलेज चालविण्याचा प्राथमिक खर्च जागतिक बँक, संबंधित सरकारें, फोर्ड व रॉकफेलर फौंडेशन्स ह्यांनीं करावयाचें ठरविलें आहे. भारत, सीलोन, इजिप्त, जपान, मेक्सिको, युगांडा, कांबोडिआ, युगोस्लाव्हिआ, सयाम, फिलिपाइन्स, पाकिस्तान, नायजेरिआ, इत्यादि देशांनीं आपआपला एक एक वरिष्ठ अधिकारी पाठविला आहे.

---

## हातमागावरील कापडाचें उत्पादन

हातमागावर उत्पन्न होऊं शकणाऱ्या कापडाविषयीं अखिल भारतीय हातमाग-बोर्डाचे सभासद् श्री. एम्. सोमप्पा ह्यांनीं एक पत्रक काढलें आहे. ते आपल्या पत्रकांत म्हणतातः— "१९६० अखेर ३०० कोटी वार कापड हातमागावर काढण्यांत यावें असें उद्दिष्ट कर्वे कमिटीनें ठरवून दिलें आहे. देशांतील हातमागावर एवढें कापड निघूं शकेल असें मला वाटतें. हातमागाच्या व्यवसायावर भारतामधील २ कोटी विणकरांचें जीवन अवलंबून आहे. म्हणून सरकारनें व नियोजन-समितीनें ह्या विषयासंबंधीं प्रामुख्यानें विचार केला पाहिजे. १९६० अखेर कापडधंद्यासाठी ठरवून देण्यांत आलेलें उत्पादनाचें उद्दिष्ट ८२० कोटि वारांचें आहे. ह्या उत्पादनापैकीं ५०० कोटी वार कापड गिरण्यांनीं निर्माण करावयाचें आहे, २० कोटी वार, यंत्रमागांनीं निर्माण करावयाचें आहे आणि ३०० कोटी वार हातमागांवर विणकरांनीं निर्माण करावयाचें आहे. भारतांत आणखी कांहीं नव्या कापडाच्या गिरण्या उभारल्यामुळें देशांतील बेकारी कमी होईल असें नाहीं. श्री. सोमाणी ह्यांनीं अशी भीति व्यक्त केली आहे कीं गिरण्यांचें उत्पादन ५०० कोटीं वार करण्याचें बंधन घातल्यामुळें भारतांत कापडाची टंचाई होईल, ही भीति बरोबर नाहीं. देशांत परकीय सत्तेचा अंमल असतांना सुद्धां हातमागाच्या धंद्यानें गिरण्यांच्या जबर स्पर्धेला तोंड देऊन आपलें आसन टिकवून धरलें. ह्यावरून गिरण्यांच्या स्पर्धेला हा धंदा यशस्वीरीत्या तोंड देऊं शकतो असें दिसून येईल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत हातमाग-विणकरांना नवीन साधनें व साहित्य पुरविण्यांत येणार आहे. त्यांचा फायदा घेऊन प्रत्येक हातमागाचें रोजचें उत्पादन ८ वारांपर्यंत वाढेल. १९३८ सालीं जुन्या प्रकारचे माग असतांनाहि १७० कोटी वार कापडाचें उत्पादन करण्यांत आलेलें आहे. हातमाग बोर्डानें दरसाल ५०० कोटी वार उत्पादनाचा अंदाज केलेला आहे. पण त्याहिपेक्षां अधिक उत्पादन सहज होऊं शकेल असें मला वाटतें."

---

## चहाच्या उत्पादनावर नियंत्रण

भारताच्या ईशान्य भागांतील चहाच्या प्रमुख मळेवाल्यांची कलकत्ता टी रेग्युलेशन कमिटी ह्या नांवाची एक संस्था आहे. चालू वर्षीं ह्या भागांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या चहासंबंधीं कमिटीनें एक पत्रक काढलें आहे. सदर पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, चहाच्या बाजाराची सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां उत्पादनावर नियंत्रण घालणें आवश्यक होऊन बसलें आहे. कमिटीवर असणाऱ्या चहावाल्यांच्या संघटना आतां उत्पादनावर नियंत्रण घालण्याच्या तपशिलाचा विचार करूं लागल्या आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, १९५६ सालीं ईशान्येकडील चहाच्या मळ्यांतील उत्पादन कमी करण्यांत येईल. कमिटीनें आपल्या सभासदांना अशी सूचना केली आहे कीं त्यांनीं आपल्या अखत्यारींतील मळ्यांत चहाच्या पानांचा जो गाळसाळ असतो त्याचा नाश करण्यास प्रारंभ करावा. त्याचप्रमाणें कमी प्रतीच्या व दर्जाच्या दृष्टीनें साशंकता उत्पन्न करणाऱ्या चहाचीहि अशीच वासलात लावण्यांत यावी. चहाच्या किंमतींवर अधिक विपरीत परिणाम होऊं न देण्यासाठीं ही दक्षता सुचविण्यांत आली आहे. भारताच्या ईशान्य भागांतील चहाच्या उत्पादनावर नियंत्रण घालण्याची पहिली योजना १९५२ सालीं अमलांत आणली गेली. त्यापूर्वीच्या वर्षांत चहाच्या धंद्याला बरीच मंदी आल्यामुळें उत्पादन-नियोजनाचा आधार घ्यावा लागला. १९५५ सालीं भारतांत चहाचें उत्पादन विपुलतेनें झालें. ह्या हंगामांत भारतामधील मळ्यांनीं ६५ कोटी पौंड चहाचें उत्पादन केलें. चहाच्या व्यापाराशीं संबंधित असलेल्यांचें म्हणणें असें आहे कीं सध्यां बाजारांतील किंमती उत्पादनाच्या खर्चाच्याहि खालीं गेलेल्या आहेत. चहाचें अमाप पीक आणि निर्यातीवरील बंधनें ह्यांच्यामुळें किंमती घसरल्या आहेत, असें त्यांचें म्हणणें आहे. स्थानिक गुदामांतून चहाचा कितीतरी सांठा पडून आहे अशी त्यांची माहिती आहे.

तमाम दंतरोगांवर
★ [illegible] म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० | |
| | | रु. ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | | रु. ६१,८३,९०० |
| ठेवी | | रु. १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | | रु. १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.



# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | पन्नास लक्ष रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | पंचवीस लक्ष रु. |
| वसूल भांडवल | साडेबारा लक्ष रु. |

संचालक मंडळ :

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाइक, जे. पी., अध्यक्ष
२. डॉ. ना. मि. परुळेकर, एम्. ए., पीएच्. डी.
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम ऊर्फ बाळासाहेब नाईक

मुख्य ऑफिस :—४५५ रविवार पेठ, पुणें २

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें १. (२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४. (३) सोलापूर (४) सांगली.

★

मुख्य ऑफिस व सांगली येथें माफक भाड्यांत सेफ-डिपॉझिट लॉकरची सोय. खातेदारांना भाड्यांत सवलत.

सदाशिव पेठ व डेक्कन जिमखाना शाखांच्या कामाच्या वेळा सकाळ-सायंकाळ आहेत.

व्याज—चालू ठेव अर्धा टक्का.★सेव्हिंग्ज—दीड टक्का तीन महिन्यांपासूनच्या मुदतठेवीवर ३ टक्के व्याज.

गो. गं. साठे, मॅनेजर



स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

☆ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ☆

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, (उपाध्यक्ष)
श्री. उ. भा. तांबे, (मॅनेजिंग डायरेक्टर)
श्री. म. मा. वाल्ह्न, श्री. गे. गो. ढोळे,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. वेंडे, श्री. द्वा. मा. मनसुख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

## कामगारांना नुकसानभरपाई

### १९५४ मध्यें २२ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम वांटली.

१९५४ मध्यें ज्या कामगारांना साधे वा प्राणघातक अपघात होऊन त्यांचें नुकसान झालें, अशांना मुंबई सरकारनें त्यासाठी उभारलेल्या खास यंत्रणेमार्फत १८,४८,३५६ रुपये नुकसानभरपाईदाखल देण्यांत आले असें कॉम्पेन्सेशन ॲक्टाच्या अंमलबजावणीबाबतच्या ३० व्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें. त्याखेरीज दुखापतींमुळें तात्पुरतें अपंगत्व आलेल्या कामगारांना मालकांनीं परभारे अर्ध्या महिन्याच्या पगाराच्या रूपानें ४,२०,४२३ रुपये नुकसानभरपाईदाखल दिले. कामगारांना अशा प्रकारची नुकसानभरपाई कमिशनर फॉर वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन यांच्यामार्फत द्यावी लागत नाहीं. अशा प्रकारें कामगारांना सर्व प्रकारें मिळून एकूण २२,६८,६७९ रुपये नुकसानभरपाईदाखल देण्यांत आले.

मुंबईचे कमिशनर फॉर वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ( अहमदाबाद विभाग सुद्धां यांच्या अधिकारांत येतो ) यांच्याशिवाय राज्यांतील निरनिराळ्या जिल्ह्यांत आणखी २९ पदसिद्ध कमिशनर या वर्षी हें काम पहात होते.

### २,५८६ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं

अहवालाच्या वर्षाच्या सुरुवातीस गेल्या वर्षी अनिर्णित राहिलेलीं ५२८ प्रकरणें होतीं आणि या वर्षी २,७४६ नवीन प्रकरणें आलीं. यापैकी २,७६६ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं व ५०८ प्रकरणें वर्षअखेरीस अनिर्णित राहिलीं होतीं. निकालांत काढण्यांत आलेल्या २,७६६ प्रकरणांपैकीं ३४५ प्रकरणें प्राणघातक अपघातांसंबंधींचीं होतीं, २,३८५ प्रकरणें दुखापतींचीं होतीं. त्यांपैकी २,१८६ प्रकरणें कायमच्या अपंगत्वाबाबतचीं आणि १९९ प्रकरणें तात्पुरत्या अपंगत्वाबाबतचीं होतीं; उरलेलीं ३६ प्रकरणें संकीर्ण स्वरूपाचीं होतीं.

एकूण ७७२ इसमांना नुकसानभरपाई देण्यांत आली, त्यांत ६९५ पुरुष व ७७ स्त्रिया होत्या. यापैकीं २५८ प्रकरणांत दुखापतीमुळें संबंधित इसम मृत्यू पावले. ४१८ प्रकरणांत त्यांना कायमचें अपंगत्व आलें व उरलेल्या ९६ प्रकरणांत संबंधित इसमांना तात्पुरतें अपंगत्व आलें.

### नुकसानभरपाईच्या रकमेची व्यवस्था

स्त्रियांना व अज्ञान मुलांना नुकसानभरपाईदाखल देण्यांत यणारी रक्कम सरकारी रोख्यांत किंवा राष्ट्रीय बचत सर्टिफिकेटांच्या स्वरूपांत अगर पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकेंत गुंतविण्यांत येतें.

संबंधित इसमांना त्यांच्या चरितार्थासाठी मधूनमधून रक्कम द्यावी लागत असल्यामुळें पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकेंत बरीच रक्कम गुंतविणें अधिक सोयीचें ठरतें. तथापि कांहीं प्रमाणांत सरकारी रोख्यांत व राष्ट्रीय बचत सर्टिफिकेटांच्या स्वरूपांत रक्कम गुंतविण्यांत आली असून अहवालाच्या काळांत अशा रीतीनें एकूण १,४८,६५० रुपये गुंतविण्यांत आले आहेत.

वर्षाच्या सुरुवातीस पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकेंत अशा प्रकारचीं २,१३४ खातीं होतीं व त्यांत एकूण १६,२९,००० एवढी रक्कम गुंतविण्यांत आली होती. अहवालाच्या वर्षांत ३१६ नवीन खातीं उघडण्यांत आलीं व एकंदर ४,९२,००० रुपये गुंतविण्यांत आले. याच वर्षांत एकूण ६,५६,२०० रुपये काढण्यांत आले. वर्षअखेरीस पोस्टांत १,८५२ खातीं होतीं व त्यांत एकूण १४,६४,७०० रुपये गुंतविले होते. बहुतेक प्रकरणांत संबंधित इसमांना चरितार्थासाठी पैसे देण्यांत आले व कांहीं प्रकरणांत जमिनी विकत घेण्यासाठीहि पैसे देण्यांत आले.

अहमदाबादच्या टेक्स्टाइल लेबर असोसिएशननें हक्काबाबतचीं ७१६ प्रकरणें हाताळलीं व संबंधित इसमांना एकूण १,७०,८४५ रुपये नुकसानभरपाईदाखल मिळवून दिले. सदरहु असोसिएशन गिरण्यांतील अगर गिरणीबाहेरील अपघातांचींहि प्रकरणें हाताळते. तसेंच या बाबतींत कामगार हा असोसिएशनचा सभासद आहे कीं नाहीं याचाहि विचार केला जात नाहीं.

गतवर्षीचीं ५१ प्रकरणें धरून मुंबईच्या राष्ट्रीय मिल मजदूर संघानें अशा प्रकारचीं २०२ प्रकरणें हाताळलीं व कामगारांना ७६,५७२ रुपये नुकसानभरपाईदाखल मिळवून दिले.

---

## कोलंबो योजनेखालील शेतीचें शिक्षण

### दुसरें पथक ऑस्ट्रेलियास पाठविण्यांत येणार

कोलंबो योजनेखालीं कोरडवाहू शेती, पशुसंवर्धन, मेंढ्यांची व्यवस्था, डेअरी, पाटबंधारे, फळझाडांची लागवड, यांसारख्या शेतीच्या विषयांचें सहा महिने प्रत्यक्ष शिक्षण घेण्यासाठी १५ भारतीय शेतकऱ्यांचें दुसरें पथक सप्टेंबर, १९५६ च्या पहिल्या आठवड्यांत ऑस्ट्रेलियास पाठविण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे.

तेव्हां ज्या शेतकऱ्यांची स्वतःची शेती आहे व जे स्वतः ती करतात, ज्यांना विकासकार्याची आवड आहे आणि ऑस्ट्रेलियाहून परत आल्यावर जे पुन्हां स्वतःची शेती करणार असतील अशा शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. अर्जदाराचें वय ३० ते ४५ वर्षांच्या दरम्यान असावें आणि त्याला इंग्रजीचें कामचलाऊ ज्ञान असावें. प्रत्यक्ष शिक्षणाचा फायदा मिळण्याच्या दृष्टीनें ते ऑस्ट्रेलियांतील शेतावर काम करण्यास तयार असले पाहिजेत. त्यांना ऑस्ट्रेलियांतील मुक्कामांत भारतीय परिस्थितीच्या संदर्भांत आपल्या विषयांतील अर्थशास्त्र शिकावें लागेल.

भारतांतील बंदरापासून ऑस्ट्रेलियास जाण्याचा व तेथून परत येण्याचा प्रवासखर्च ऑस्ट्रेलियन सरकार करील. तसेंच तेथील रहाण्याच्या व इतर आवश्यक खर्चासाठी योग्य तो भत्ताहि मिळेल. भारतांतील प्रवासखर्च उमेदवारास करावा लागेल. तसेंच शिक्षणाच्या काळांतील इतर प्रासंगिक खर्चहि त्याला स्वतःला करावा लागेल.

अर्जाचे फॉर्म फॉरेन एड ब्रँच, मिनिस्ट्री ऑफ फूड ॲण्ड ॲग्रिकल्चर, १, क्वीन व्हिक्टोरिया रोड, नवी दिल्ली, यांच्याकडे मिळूं शकतील. मुंबई राज्यांतील शेतकऱ्यांनीं डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, मुंबई राज्य, पुणें १, यांच्याकडे ३१ जानेवारीपूर्वी अर्ज पाठवावे. सदरहू अधिकारी ते अर्ज मुंबई सरकारमार्फत भारत सरकारकडे पाठवतील.

नवी दिल्ली येथें मुलाखत घेतल्यानंतर उमेदवारांची अंतिम निवड करण्यांत येईल.

---

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## CO-OPERATION & ACCOUNTANCY DIPLOMA BOARD, POONA

The undermentioned candidates have been declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in October 1955, at Poona.

Passed in the whole Examination including those, who have passed in one or the other part previously.

### I Class

Dani M. P.

### II Class

Nil

### Pass Class

Bhonsale D. S , Ghargi L. V., Gupta B. N., Hathi P. V., Inamdar N. S., Koranne P. G., Kulkarni V. K., Patel A. F, Pawar F. D., Vaishampayan N. V., Vandkurdi B. T., Desai G. M ,:Dodia N. S., Tilak N. B.

### Passed in Co operation Group only

Dudhwala S. I., Gohil M. N., Kale V. Y., Misal B. D., Patel V. V., Thakar H. R.

### Passed in Accountancy Group only

Patel R. M., Aphale G. S., Bedekar B. N., Bhagwat A. G., Biradar R. S., Desai M. G. Deshmukh C. P., Joshi V. A., Kale S. V., Karpe M. R., Khire V. B., Mandke R. B., Pandya B. S., Patel N. R., Patil A. B., Patted S. C., Phadke B. W., Purohit H. M., Sathe V. M., Shah J. K., Sheth K. C., Thombare M. C., Vani J. T. Vora U. D.

**F. N. Rana.**

Registrar, Co-operative Societies, B. S,, Poona,
and
Chairman, Co-operation and Accountancy
Diploma Board.

## लिफ्ट इरिगेशन सोसायटयांना आर्थिक साहाय्य

### अन्यपिकें लावण्याबाबतची अट काढून टाकली

लिफ्ट इरिगेशनचें काम हातीं घेणाऱ्या सहकारी संस्थांना आर्थिक साहाय्य अथवा कर्ज देतांना आतांपर्यंत सरकारतर्फे अन्नधान्यें, कडधान्यें, भाजीपाला आणि कांदे यांची लागवड करण्याबाबत जी अट घालण्यांत येत असे, ती अट सरकारनें आतां काढून टाकली आहे.

लिफ्ट इरिगेशनच्या योजनेंतील शेतकऱ्यांनीं आपल्या लागवडीखालील एकूण जमिनीपैकीं निदान निम्म्या जमिनींत, पांच वर्षेपर्यंत आणि त्यानंतर रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् हे वेळोवेळीं ठरवून देतील त्या मुदतीपर्यंत अन्नपिकें, कडधान्यें, भाजीपाला आणि कांदे यांची लागवड केली पाहिजे अशी ही अट होती. त्याचप्रमाणें, उरलेल्या निम्म्या जमिनींतहि बिगर अन्नपिकें लावतांना ती बॉम्बे ग्रोथ ऑफ फूड क्रॉप्स ॲक्टानुसार ठरवून दिलेल्या प्रमाणांतच लावली पाहिजेत, अशीहि अट घालण्यांत येत असे.




सांड्र
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी
महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !
दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ
इन्शुअरन्स कं. लि.
हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९
ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.
६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.